


कामगार, शेतकरी, कष्टकऱ्यांच्या प्रश्नांवर आवाज उठवणारे

साप्ताहिक

# क्रांतिवीर

संपादक–मोहन गुंड

skrantiveer66@gmail.com




वर्ष १३ वे अंक ४ था | सोमवार,दि.११ ऑगस्ट २०२५ | RNI.No.MHMAR/ 2013/50191 | पाने ४ | किंमत १ रुपये

# बीडमध्ये प्रथमच क्रांतिसिह नाना पाटील जयंती उत्सव

एवढ्या मोठ्या कार्यक्रम आयोजन पाहुन अनेकांच्या भवया उंचावल्या

शेतकरी कामगार पक्षाचा वर्धापन दिन उत्साहात

दहा व्यक्तींचा पुरस्काराने केला गौरव

## शेकापचे भाई मोहन गुंड यांचे नियोजन







बीड/क्रांतिंवीर प्रतिनिधी

शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई मोहन गुंड यांनी केजमध्ये सुरू असलेला क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नावाचा पुरस्कार सोहळा बीडमध्ये घेऊन आले ही कौतुकाची बाब आहे. क्रांतिसिंह नाना पाटील यांचे कार्य चंद्र–सूर्य असेपर्यंत जनमानसात जिवंत राहील. त्यांच्या विचारांना अभिप्रेत असे कार्य खासदार या नात्याने करण्याचा मी प्रयत्न करीन, असेही त्यांनी सांगितले. बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात रविवारी (दि.३) शेतकरी कामगार पक्ष व क्रांतिसिंह नाना पाटील शेतकरी विकास प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने पुरस्कार वितरण आणि क्रांतिसिंह नाना पाटील व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून खा.बजरंग सोनवणे हे बोलत होते.

पक्षाचे ध्वजारोहण राज्य चिटणीस मंडळ सदस्या चित्राताई गोळेगावकर व प्रा. उमाकांत राठोड यांच्या हस्ते झाले. यावेळी ज्येष्ठ नेत्या सुशिला मोराळे, माजी आमदार उषा दराडे, शेकापचे जिल्हा चिटणीस भाई विष्णूपंत घोलप, राजकुमार घायाळ (हमाल मापाडी महामंडळ), ॲड.अजय बुरांडे (माकप), इकबाल पेंटर, चंद्रकांत चव्हाण (शिक्षक आघाडी), भाऊराव प्रभाळे (भाकप), राजेश घोडे (आझाद क्रांती सेना), रोहिदास जाधव (एसएफआय), प्रा. पंडित तुपे (युक्रांद), गणेश मस्के (संभाजी ब्रिगेड), ॲड. राहुल वायकर (विभागीय संभाजी ब्रिगेड), नितीन सोनवणे (पँथर सेना), सुभाष लोणके (डीपीआय), ड.शिवाजी कांबळे (समाजवादी पक्ष), अशोक येडे (आप) आदी मान्यवर उपस्थित होते. खा.बजरंग सोनवणे म्हणाले, क्रांतिसिंह नाना पाटील यांचे कार्य सुरू झाले, तेव्हा माझा जन्मही झालेला नव्हता. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ भाई मोहन गुंड गेल्या अनेक वर्षांपासून पुरस्कार सोहळा आयोजित करत आहेत. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी समाज प्रबोधन करत विविध समाजघटक एकत्र आणले. परंतु अलीकडील काळात जातीय विष पसरवणारे काहीजण वाढले आहेत. असे लोक कोणत्याही समाजाचे नसतात. त्यांना थारा देऊ नये. भाई मोहन गुंड यांचे कार्य राज्यभर सुरू आहे. केजचे सुपुत्र म्हणून त्यांचा आम्हाला अभिमान आहे, असे खा.बजरंग सोनवणे म्हणाले. कार्यक्रमात अनेक मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक भाई मोहन गुंड यांनी केले, सूत्रसंचालन व्याख्याते राहुल गिरी यांनी केले तर आभार प्रदर्शन ड.नारायण गोले पाटील यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भाई बापुसाहेब साळुंके, नागेश मिठे, अर्जुन सोनवणे, अशोक रोडे, संदीप पन्हाळे, अंगद मोहिते, मुकुंद शिंदे यांच्यासह इतरांनी प्रयत्न केले. कार्यक्रमास शेकापचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### भाई मोहन गुंड यांच्या नियोजनाचे कौतुक

भाई मोहन गुंड व पक्षातील कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केले. यानिमित्त अनेक वर्षांनंतर जिल्हाभरातील शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते एकत्र आले होते. मान्यवरांनी त्यांच्या नियोजनाचे विशेष कौतुक केले.

### पुरस्कार प्राप्त मान्यवरांचा सन्मान

अरुण जाधव (राजकीय), राजाभाऊ देशमुख (कृषी), सुधाकर देशमुख (पर्यावरण), डॉ. संदीप तांबारे (आरोग्य), शाहीर राजेंद्र कांबळे (सांस्कृतिक), कॉ.राजकुमार कदम (शैक्षणिक), उज्वला पडलवार (कामगार), ह.भ.प. श्यामसुंदर सोन्नर (सांप्रदायिक), संपत मोरे (पत्रकारिता), जागृती अमरजीत तिवारी (क्रीडा) या मान्यवरांचा उल्लेखनीय कार्याबद्दल सन्मान करण्यात आला.





कार्यक्रामचे आयोजक भाई मोहन गुंड यांचा उत्कृष्ठ आयोजनाबद्दल शिक्षक संघटनेच्या वतीने सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. यावेळी संघटनेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

## सत्कारमूर्ती













# जनसुरक्षा विधेयका विरोधात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र निदर्शने

बीड/प्रतिनिधी/क्रांतिंवीर प्रतिनिधी

ब्रिटिशांनी जनतेची मुस्कटदाबी करण्यासाठी १९२८ साली 'पब्लिक सेफ्टी बील' आणले होते, शहिदे आझम भगतसिंग यांनी असेंम्ब्लीत बॉम्ब स्फोट घडवून त्याचा निषेध केला होता. महाराष्ट्र सरकारने २०२४ साली, तेच बील त्याच नावाने आणून लोकशाहीवर घाला घातला आहे. हे विधेयक रद्द करण्यात यावे यासाठी बीड येथे डावे, पुरोगामी व परिवर्तनवादी पक्ष संघटनांनी तीव्र निदर्शने केली.

याबाबत अधिक माहिती अशी की, महाराष्ट्र विधिमंडळाने महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा कायदा २०२४ संमत केला आहे. हा कायदा जनतेची मुस्कटदाबी करणारा, जनतेच्या मुलभुत हक्कांवर गदा आणणारा असल्याने सदरील विधेयकावर राज्यपाल महोदयांनी स्वाक्षरी न करण्याची मागणी राज्यातील डाव्या, पुरोगामी व परिवर्तनवादी पक्ष संघटनांनी राज्यपालांकडे समक्ष भेटून केली आहे. काल नऊ ऑगस्ट क्रांतीदिन होता. याच दिवशी महात्मा गांधींनी ब्रिटिश सरकारला 'चले जाव ' चा आदेश दिला होता. त्यानंतर खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य लढा तीव्र होऊन ब्रिटिशांना देश सोडावा लागला होता. याच दिनाचे औचित्य साधून बीड येथील डाव्या, पुरोगामी व परिवर्तनवादी पक्ष संघटनांनी या कायद्या विरोधात ती निदर्शने करून लोकशाही विरोधी कायदा रद्द करण्याची मागणी केली. भाकप, माकप, शेकाप, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, आम आदमी पार्टी, शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे, एकल महिला संघटना, संभाजी ब्रिगेड, छावा, मराठा महासंघ, शिवभीम संघटना आदी पक्ष व संघटनांचे नेते आंदोलनात सहभागी झाले होते. कॉम्रेड पी. एस. घाडगे, कॉम्रेड डी. जी. तांदळे, कॉम्रेड ड. अजय बुरांडे, भाई मोहन गुंड, दादासाहेब मुंडे, जोतिराम हुरकुडे, राजकुमार कदम, बाळासाहेब मोरे, रामधन जमाले, कॉम्रेड बब्रुवान पोटभरे, कॉम्रेड दत्ता डाके, रोहिदास जाधव, शिवाजी हिंदुळे, सय्यद सादेक, माऊली शिंदे, परवेज कुरेशी, रुक्मिण नागापुरे, शिल्पा पंडित, किस्किंदा पांचाळ, संजीवनी पखाले, नितीन जायभाये यांच्यासह शेकडो कार्यकर्ते आंदोलनात सहभागी झाले होते.



# संपादकीय

## भूतदयेचे भूत

श्वानप्रेमी आणि श्वानविरोधक यांची रस्त्यावरील श्वानांवरून जुंपणारी लढाई ही आपल्याकडची नेहमीची गोष्ट. पण या संघर्षाची कबुतरांपासून ते हत्तींपर्यंत विस्तारलेली व्याप्ती आणि त्याला असलेले वेगवेगळे पैलू यांच्या नुकत्याच झालेल्या दर्शनातून माणूस आणि प्राणी यांचे सहजीवन किती विस्मयचकित करणारे आहे हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले. कोल्हापुरातील महादेवी हत्तिणीवरून झालेला वाद असो की मुंबईतील ५१ कबुतरखाने बंद करण्याच्या निर्णयाविरोधात दादर येथील कबुतरखाना परिसरात झालेले आंदोलन असो, प्राणी–पक्षी आजही माणसाच्या भावविश्वाचा भाग आहेत, ही खरे तर आजच्या यांत्रिकीकरणाचे टोक गाठू पाहणाऱ्या, सगळ्याच नातेसंबंधांमध्ये व्यावसायिकतेचा कळस गाठणाऱ्या जगण्यातली सुखद, दिलासादायक गोष्ट. पण प्राण्यांविषयीचे माणसाचे हे प्रेम खरोखरच्या प्रेमाच्या उमाळ्यातून, खऱ्याखुऱ्या भूतदयेतून येते का, याचे उत्तर संदिग्ध असते आणि प्राणीप्रेम निवडक असेल तर त्याकडे कसे बघायचे असा प्रश्न उपस्थित होतो.माणूस आणि प्राणी यांच्या सहजीवनाचा इतिहास मुळात भूतदयेतून सुरू होत नाही. माणूस हा इतर सर्व प्राण्यांसारखाच निसर्गातील एक प्राणी असल्यापासून ते त्याच्या आजच्या अत्यंत प्रगत अशा टप्प्यापर्यंतच्या वाटचालीत वेगवेगळ्या टप्प्यांवर त्याने त्याचे जगणे अधिक सुलभ करण्याच्या प्रयत्नांत त्याला उपयोगी असलेल्या प्राण्यांना माणसाळवले आणि विविध कामांसाठी, विविध पद्धतींनी त्यांचा वापर करून घेतला. गोवंशीय प्राणी, शेळ्या–मेंढ्यादी प्राणी, हत्ती, उंट, हरणे, घोडे, गाढवे, डुकरे, कुत्रे–मांजरे, कोंबड्या या सगळ्याच प्राण्यांचा त्याला या ना त्या प्रकारे उपयोग होता. मनोरंजनासाठी पोपट पाळणे, निरोप देण्यासाठी कबुतरे पाळणे याची मूळ प्रेरणा भूतदया नाही. मुळातच स्वतंत्र असलेल्या आणि आपल्याहून दुबळ्या अशा कोणत्याही जिवाला आपल्या अंकित करून घेणे आणि पाळणे म्हणजेच त्याच्यावर मालकी हक्क प्रस्थापित करणे हे क्रौर्याचेच लक्षण. वाघ, सिंह, बिबट्यासारख्या एखाद्या प्राण्याने मी माणसाला पाळतो, असे म्हटले असते, तर?हत्ती तसेच कबुतरांवरून सुरू असलेला सध्याचा संघर्षही फारसा वेगळा नाही. जंगलात वावरण्यासाठी जन्माला आलेला हत्तीसारखा प्राणी एखाद्या मठाचे भूषण का असावा? हत्ती हा प्राणी ऐश्वर्याचे, समृद्धीचे प्रतीक मानला जातो. या अत्यंत बुद्धिमान आणि तितक्याच ताकदवान प्राण्याचा माणूस आपल्या स्वार्थासाठी वापर करत आला आहे. कोल्हापुरातील शिरोळ तालुक्यातील नांदणी गावातील महादेवी हत्तिणीवरून निर्माण झालेला संघर्ष एक गाव, त्यातील सामान्य माणसे विरुद्ध बलाढ्य न्यायसत्ता आणि अर्थसत्ता एवढाच नाही तर हत्तिणीच्या ताब्यावरून दोन्ही बाजूकडचे दुखावले गेलेले अहंकारही त्यामागे आहेत. गावातील लोकांना महादेवी ही हत्तीण त्यांच्या गावाचे भूषण वाटत होती आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे तिला गावातून वनतारा इथे नेणे या गोष्टीला त्यांचा विरोध होता. इथल्या सामान्य लोकांनी त्यांना फोन सेवा पुरवणारी विशिष्ट कंपनी बदलणे, त्याच कंपनीचे पेट्रोल न वापरणे अशा छोट्या छोट्या पण प्रतीकात्मक गोष्टींमधून आपला निषेध अधिक तीव्र करत नेल्यामुळे शेवटी संबंधितांना या विरोधाची दखल घ्यावी लागली. पण मुळात कोणालाही हत्ती ताब्यात हवाच कशाला?याउलट मुंबईतील संघर्ष राजसत्ता– न्यायसत्ता विरुद्ध एक विशिष्ट समाज असा होता. परिसरातील माणसांच्या आरोग्याच्या कारणास्तव टप्प्याटप्प्याने मुंबईतील ५१ कबुतरखाने बंद करण्याचा राज्य सरकारचा निर्णय, न्यायालयात सुरू असलेली सुनावणी आणि या निर्णयाला भूतदयेच्या मुद्द्यावर विशिष्ट समुदायाचा विरोध यातून माणूस महत्त्वाचा की प्राणी किंवा पक्षी हा नेहमीचा वादाचा मुद्दा पुढे आला. कबुतरांची विष्ठा व पिसे यांच्यामुळे माणसाच्या श्वसन यंत्रणेला धोका असतो, त्यामुळे मानवी वस्तीच्या परिसरात कबुतरखाने असता कामा नयेत असे एक बाजू सांगते, तर कबुतरखाना बंद केल्यामुळे कबुतरे रस्त्यावर मरून पडत आहेत, हा निर्णय आमच्या धर्माच्या विरोधात जाणारा आहे, असे दुसरी बाजू सांगते. ब्रिटिशांच्या काळात मुंबईत कबुतरखाने सुरू झाले आणि वाढत गेले, असे सांगितले जाते. पण तेव्हाची नागरी वस्ती, लोकसंख्या यांची आजच्या काळाशी तुलनाच होऊ शकत नाही. लोकसंख्येची घनता प्रचंड असलेल्या मुंबईसारख्या शहरात कबुतरांमुळे माणसांच्या आरोग्याला त्रास होणार असेल तर हळूहळू करत कबुतरखाने बंद करत जाणे हाच मार्ग असू शकतो. पण त्याला धर्माचा पैलू जोडला गेल्यामुळे आता तो कठीण होऊन बसला आहे. कबुतर घरात येऊ नये म्हणून जाळ्या लावल्या जातात आणि पुण्य कमावण्यासाठी तेच कबुतर रस्त्यावर किंवा घराच्या आसपास कुठे तरी असावे याची सोय केली जाते यातला दुटप्पीपणा संबंधितांच्या लक्षातही येत नाही, याला कारण त्यांचे निवडक प्राणीप्रेम हेच आहे.नांदणी गावातील हत्तीण वनतारामध्ये नेली म्हणून राज्यभरातून आरडाओरडा होतो आहे. पण ही ओरड करणाऱ्यांपैकी काही जण घरात पाळलेला कुत्रा नकोसा झाला म्हणून कुठे तरी रस्त्यावर सोडून देत असतील, त्याचे काय? हत्तिणीला परत आणा म्हणणाऱ्यांपैकीच कुणीतरी त्यांच्या भागातील रस्त्यावरील भटक्या कुत्र्यांवर विषप्रयोग करणाऱ्यांपैकी नसतील कशावरून? अनेकांना घरात मांजर हवी असते, पण तिला झालेली पिल्ले नको असतात. ती कुठे तरी दूर नेऊन सोडून दिली जातात, त्याचे काय? गाय हा आपल्याकडचा पवित्र प्राणी. गायीचे, म्हशीचे दूध हा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग. आपल्याला नियमित आणि भरपूर दुग्धपुरवठा व्हावा यासाठी गायी–म्हशींना कोणत्या दिव्यातून जावे लागते, हे आपल्याला माहीत असते का?

# भारताच्या अंतराळ युगाचे शिल्पकार विक्रम साराभाई



भारताच्या अंतराळ संशोधनाचे पितामह आणि आधुनिक भारताच्या अंतराळ युगाचे शिल्पकार म्हणून ओळखले जाणारे महान संशोधक विक्रम साराभाई यांची उद्या म्हणजे १२ ऑगस्ट रोजी जयंती. अंतराळात भरारी मारणारा भारत असे आपण म्हणतो. एकवेळ सुई ही बनवू न शकणारा आपला भारत आज विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रात स्वयंपूर्ण बनला आहे. अंतराळ विज्ञान क्षेत्रात तर भारताने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. अंतराळ विज्ञान क्षेत्रात भारत जागतिक महासत्ता बनत आहे याचे सर्व श्रेय विक्रम साराभाई यांनाच जाते. विक्रम साराभाई यांचा जन्म १२ ऑगस्ट १९१९ रोजी झाला. त्यांचे वडील प्रसिद्ध उद्योगपती होते त्यामुळे देशातील मोठ्या नेत्यांचे त्यांच्या घरी उठबस असायची. त्यांच्या वडीलांनाही विक्रम साराभाई यांनी राजकारणात यावे किंवा उद्योगपती बनावे असे वाटत होते पण नियतीच्या मनात वेगळेच होते. विक्रम साराभाई यांना गणित आणि विज्ञान विषयाची खूप आवड होती. १२ वि नंतर उच्च शिक्षण घेण्यासाठी ते विदेशात गेले. केंब्रिज विद्यापीठात त्यांनी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला. अतिशय तल्लख बुद्धीच्या विक्रम साराभाई यांनी अल्पावधीतच विज्ञान शाखेची पदवी पूर्ण केली. भारतात आल्यावर त्यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स मध्ये नोबेल पुरस्कार विजेते सर सी व्ही रमण यांच्या मार्गदर्शनाखाली कोस्मिक किरणांवर संशोधन केले. १९४२ साली त्यांनी प्रसिद्ध नृत्यांगना मृणालिनी साराभाई यांच्याशी विवाह केला. त्यांना कार्तिक आज मल्लिका हे दोन अपत्य झाली. १९४५ साली ते ब्रिटनला गेले तिथे त्यांनी इन्वेस्टीगेशन इन ट्रॉपिकल लॅटिट्युडवर संशोधन करून पीएचडी मिळवली. ११ नोव्हेंबर १९४७ ला अहमदाबादला त्यांनी फिजिकल रिसर्च लॅबरोटरीची स्थापना केली. केरळ जवळील थुंबा हे ठिकाण लाँच पॅड साठी निश्चित करण्यात आले कारण हे ठिकाण मॅग्नेटिक इक्वेटर लाईन ( चुंबकीय भूमध्य रेखा ) च्या अगदी जवळ होते पण त्याठिकाणी काही घरे होती तसेच एक चर्चही होते त्यामुळे तेथील लोक तेथून हटण्यास तयार नव्हते भौगोलिक आणि वैज्ञानिक कारणामुळे ही जागा खूप महत्वाची होती पण तेथील लोक ती जागा देण्यास तयार नव्हते शेवटी विक्रम साराभाई यांनी त्या लोकांची भेट घेतली त्या जागेचे महत्व त्यांना समजावून सांगितले. विक्रम साराभाई यांच्यामुळे ती जागा सरकारला देण्यास लोक तयार झाले. भारत सरकारने त्याठिकाणी थुंबा रॉकेट लाँचिंग स्टेशनची स्थापना केली. २१ नोव्हेंबर १९६५ ला तिथून पहिल्या रॉकेटचे प्रेक्षपण करण्यात आले ते यशस्वी झाले. विक्रम साराभाई यांच्यामुळे हे शक्य झाले म्हणून भारत सरकारने या स्टेशनचे विक्रम साराभाई स्पेस सेंटर असे नामांतर केले. विक्रम साराभाई स्पेस सेंटर तर उभारले गेले पण तिथे तज्ज्ञ संशोधकांचा तुटवडा भासू लागला. देशातील तरुण संशोधक विदेशात सेवा बजावत होते. विक्रम साराभाई यांनी त्यांना भारतात परतण्याचे आवाहण केले. त्यांनी या संशोधकांना सांगितले की देशाचे बजेट कमी असल्याने आम्ही तुम्हाला परदेशात आहेत त्याप्रमाणे वातानुकूलित प्रयोगशाळा आणि ऑफिस देऊ शकणार नाही, पण टेबल खुर्ची आणि एक कपाट नक्की देऊ. भारत मातेच्या सेवेसाठी तुम्ही देशात परत या. त्यांच्या आवाहनाला अनेक संशोधकांनी प्रतिसाद दिला. वसंत गोवरीकरांसारखे महान शास्त्रज्ञ त्यांच्या आवाहानाला प्रतिसाद देऊन भारतात परतले. त्यांनी तज्ज्ञ सांशीधकांची एक टीम बनवली त्यांच्या नेतृत्वाखालील या टीमने विमानाचे, अंतरिक्ष यानाचे ( रॉकेट ) उड्डाण यशस्वी व्हावे यासाठी जीवाचे रान केले. दिवस रात्र मेहनत केली. त्यांच्या या अविश्रांत मेहनतीचे फळ म्हणजे 'आर्यभट्ट' हा भारताचा पहिला उपग्रह अंतराळात झेपावला. अंतराळ क्षेत्रात भारताने पहिले यशस्वी पाऊल टाकले. डॉ विक्रम साराभाई यांच्या अथक प्रयत्नांमुळेच भारतीय अवकाश संशोधन संस्थेची ( इसरो) ची स्थापना झाली. आयआयएम अहमदाबाद च्या स्थापनेतही त्यांचे मोलाचे योगदान आहे. १९६६ साली डॉ होमी जहांगीर भाभा यांच्या निधनानंतर ते परमाणु ऊर्जा आयोगाचे अध्यक्ष बनले. अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांची अध्यक्षपदे त्यांनी भूषवली. अवकाश संशोधनासोबतच टेक्सटाईल, फार्मासिटीकल, अणुऊर्जा, कला या क्षेत्रातही त्यांनी विशेष कामगिरी केली. आज भारत अंतराळ विज्ञान क्षेत्रात स्वयंपूर्ण आहे यामागे विक्रम साराभाई यांचे अथक परिश्रम, दूरदृष्टी आणि खंबीर नेतृत्व ह्यांचा मोलाचा वाटा आहे. डॉ अब्दुल कलाम यांनीही आपल्या अग्निपंख या आत्मचरित्रात विक्रम साराभाई यांच्या नेतृत्व गुणाचे कौतूक केले आहे. डॉ अब्दुल कलाम विक्रम साराभाई यांच्या विषयी म्हणतात, 'ते स्वप्न पहायचे आणि ते प्रयक्षात उतरवण्यासाठी मेहनतही घ्यायचे. त्यांचे व्यक्तिमत्व आणि कार्य त्यांच्या सहकाऱ्यांसाठी नेहमीच प्रेरणास्रोत ठरले आहे. त्यांनी त्यांच्या सहकाऱ्यांना वेगळी दृष्टी दिली. विक्रम साराभाई हे भारतीय अंतराळ युगाचे शिल्पकार आहेत.' त्यांच्या कार्याची दखल घेऊन भारत सरकारने त्यांना पद्मभूषण व पद्मविभूषण या मानाच्या पुरस्काराने गौरविले आहे. विज्ञानाचा उपयोग मानवी जीवन सुखी व समृद्ध करण्यासाठी झटणाऱ्या या महान संशोधकाचे ३०डिसेंबर १९७१ साली थुंबा येथेच हृदयविकाराने निधन झाले. विक्रम साराभाई यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५



केज : दि. वैद्यनाथ अर्बन को– ऑप. बँक लि. संचालक मंडळ पंचवार्षिक निवडणूक–२०२५ आज केज शहर येथील मतदान केंद्रावर बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे यांनी मतदानाचा हक्क बजावला.

# सांची बुद्ध विहारात श्रावण पौर्णीमा उत्साहात साजरी



माजलगाव/प्रतिनिधी

( प्रतिनिधी ) तथागत भगवान बुद्धांच्या जिवनात वर्षाच्या बारा पौर्णीमांना महत्व आसुन प्रत्येक पौर्णिमा बौद्ध बांधव विविध ठीकाणी उत्साहात साजरी करत आसतात याच प्रमाणे सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन केसापुरी कॅम्प येथे भारतीय बौद्ध महासभा तालुका – शाखा माजलगांवच्या वतीने वर्षावासातील महत्वाची आसणारी श्रावण पोर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे हे होते तर या कार्यक्रमासाठी भारतीय बौद्ध महासभा जिल्हा बीडच्या वतीने राबवण्यात रेत असलेल्या प्रवचन मालीकेतील विषय घेऊन प्रमुख मार्गदर्शक म्हणुण भारतीय बौद्ध महासभा जिल्हा संस्कार सचिव श्यामभाऊ वाघमारे,जिल्हा हिशोब तपासणीस एम.वाय. काळे,जिल्हा संरक्षण सचिव आर. डी.जोगदंड हे उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणुन भारतीय बौद्ध महासभा महिला जिल्हा अध्यक्षा कमलताई डोंगरे,जिल्हा संस्कार उपाध्यक्षा लिलाताई उजगरे,जिल्हा पर्यटन सचिव एन बी.राजभोज,जिल्हा संघटक शारदाताई तांगडे,वंचित बहुजन आघाडीचे जेष्ठ नेते अंकुश जाधव,माजी संरक्षण उपाध्यक्ष गुलाब प्रधान, बहुजन समाज पार्टीचे,हरिभाऊ साळवे,शेलापुरीचे उपसरपंच शुशीलाताई घडसे हे उपस्थित होते.

या कार्यक्रमात एम. वाय.काळे यांनी श्रावण पौर्णीमेचे महत्व सांगीतले व वर्षावासात चालु असलेले भगवान बुद्ध आणी त्यांचा धम्म या ग्रंथाचे वाचन केले,तर शामभाऊ वाघमारे यांनी महामंगल सुत –मानवाचे मंगल कशात आहे विषयी मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचे प्रस्ताविक भारतीय बौद्ध महासभा महिला तालुका अध्यक्षा मंदाताई साळवे यांनी केले तर सुत्रसंचलन संस्थेचे ता सरचिटनीस सिद्धार्थ वक्ते यांनी केले.तर या कार्यक्रमा साठी धम्म उपासिका यांच्या दानातुन भोजनदान देण्यात आले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नाथा घडसे,डी पी पोटभरे आप्पा ,डी पी वाघमारे नाना,बाबासाहेब घनघाव,राजभाऊ साळवे,बळीराम काकडे, तात्यासाहेब साळवे ,कोमलताई डोंगरे,अनुराधाताई साळवे, विशाखाताई वाघमारे ,सिमा साळवे निलावती साळवे,चंद्रकला साळवे,गिरजाबाई पोहरे,गायकवाड ताई ,रमाताई राजभोज, प्रभाववती वाघमारे,वैभव साळवे,सह भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले

# बीडमध्ये १७ ऑगस्टला राज्यस्तरीय लहान मुलांचा फॅशन शो

## चला हवा येऊ द्या सेलिब्रिटींच्या उपस्थितीत रंगणार भव्य सोहळा

बीड /प्रतिनिधी

देवगिरी प्रतिष्ठान, संचलित तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीड यांच्या वतीने राज्यस्तरीय लहान मुलांचा फॅशन शो 'चॅम्प ऑन रॅम्प २०२५' हा भव्य कार्यक्रम रविवार, दि.१७ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ वाजता बीड येथील रामकृष्ण लॉन्स, कॅनॉल रोड, शाहूनगर, ऋबीड येथे आयोजित करण्यात येणार आहे.या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे 'चला हवा येऊ द्या' या लोकप्रिय टीव्ही कार्यक्रमातील सेलिब्रिटी पाहुण्यांची विशेष उपस्थिती, जी संपूर्ण कार्यक्रमात विशेष आकर्षण ठरणार आहे. कार्यक्रमात राज्यभरातील विविध फॅशन डिझायनिंग कॉलेजांमधील विद्यार्थी–डिझायनर्सना स्वतः डिझाइन केलेल्या पोशाखांचे सादरीकरण करण्याची संधी दिली जाणार असून, या पोशाखांचे सादरीकरण ३ ते १५ वयोगटातील बाल कलाकार रॅम्पवर मॉडेल्सच्या रूपात करणार आहेत.

स्पर्धा तीन गटांत होणार असून पहिला गट ३ ते ६ वर्षे, दुसरा गट ७ ते ११ वर्षे आणि तिसरा गट १२ ते १५ वर्षे असा असेल. सर्व सहभागी बालक व डिझायनर्सना ट्रॉफी, प्रमाणपत्र, प्रोफेशनल फोटोशूट आणि दोन मोफत प्रवेश पास देण्यात येतील. याशिवाय 'बेस्ट चॅम्प ऑन रॅम्प' आणि 'बेस्ट डिझायनर' या पुरस्कारांसाठी प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकांचे सन्मान दिले जातील.नोंदणी शुल्क ७०० असून जागा मर्यादित आहेत. इच्छुकांनी नोंदणीसाठी किंवाया क्रमांकांवर संपर्क साधावा किंवा पोस्टरवरील क्यूआर कोड व ऑनलाईन लिंक वापरावी. बालक व डिझायनर्ससाठी स्वतंत्र नोंदणी लिंक व क्यूआर कोड उपलब्ध असून, आपल्या श्रेणीनुसार योग्य पर्याय वापरावा. पालकांनी आपल्या मुलांची त्वरित नोंदणी करून त्यांना फॅशन रॅम्पवर झळकण्याची संधी द्यावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# केज जवळ भरधाव कार पुलाला धडकली

## वृद्धाचा मृत्यू तर आठ जण जखमी

केज/प्रतिनिधी

कपिलधार येथून देवदर्शन करून नांदेडकडे जात असलेल्या भाविकांच्या इर्टिगा कारने केज–अंबाजोगाई दरम्यान असलेल्या चंदनसावरगाव जवळच्या एका हॉटेलजवळ असलेल्या पुलाला दिलेल्या धडकेत एक वृद्धाचा मृत्यू झाला असून त्याच कारमधील आठजण जखमी झाले आहेत.

दि. १० ऑगस्ट रोजी सायंकाळी ५:३० वाजण्याच्या सुमारास नांदेड जिल्ह्यातील कारेगाव येथील भाविक हे कपिलधार येथील मन्मथ स्वामींच्या समाधीचे दर्शन घेऊन नांदेड जिल्ह्यातील त्यांच्या गावाकडे जात असताना केज–अंबाजोगाई दरम्यान चंदनावरगाव ता. केज येथील हॉटेल मोरया जवळ असलेल्या एका पुलाला त्यांची इर्टिगा कार क्र.(एम एच–२६ /सी पी–६३१५) ही भरधाव वेगातील कार पुलाला धडकली. या भीषण अपघातात कार मधील एका वृद्धाचा जागीच मृत्यू झाला. तर इतर आठ जण गंभीर जखमी झाले. मृत व जखमी सर्वजण नांदेड जिल्ह्यातील कारेगाव येथील रहिवासी आहेत. या भीषण अपघातात मृत झालेल्या वृद्धाचे नाव निवृत्ती मुलपडे (वय ७०) असे आहे.


# रक्षाबंधन भाऊबहिणीच्या नात्याचा उत्सव

भारतीय संस्कृतीमध्ये प्रत्येक सणाला एक खास अर्थ आणि भावना जोडलेली असते. या सणांमधून नाती दृढ होतात, परंपरा पुढे जाते आणि संस्कारांची शिदोरी पुढच्या पिढीला मिळते. याच सणांपैकी एक अत्यंत हळवा, प्रेमळ आणि भावनिक सण म्हणजे रक्षाबंधन. हा सण म्हणजे केवळ एका दोरीचं बंधन नाही, तर एका नात्याचं ज्या नात्यात प्रेम, आपुलकी, जबाबदारी आणि विश्वास यांचं गहिरे अस्तित्व आहे.

रक्षाबंधन म्हणजे बहिण भावाच्या हातात राखी बांधते, त्याला ओवाळते आणि त्याचं रक्षण व्हावं अशी प्रार्थना करते. त्याबदल्यात भाऊ तिला वचन देतो तिचं आयुष्यभर रक्षण करण्याचं. पण या सोप्या कृतीच्या मागे असतो एक अमर प्रेमाचा धागा – असा धागा जो कुठल्याही स्वार्थाशिवाय फक्त आपुलकीवर आधारलेला असतो.या सणाची सुरुवात केव्हा झाली, याबद्दल अनेक कथा सांगितल्या जातात.

द्रौपदी आणि श्रीकृष्ण : महाभारतातील ही कथा फार प्रसिद्ध आहे. जेव्हा श्रीकृष्णाला जखम होते, तेव्हा द्रौपदी तिच्या साडीचं कापड फाडून त्याच्या हातावर बांधते. त्याच वेळी श्रीकृष्ण तिला वचन देतो की, तिच्यावर संकट आलं, तर तो तिला वाचवेल. चिरहरणाच्या प्रसंगी हे वचन श्रीकृष्णाने निभावलं.

राणी कर्णावती आणि हुमायून : मेवाडची राणी कर्णावतीने दिल्लीच्या बादशहाला राखी पाठवून मदतीची याचना केली होती. त्यावेळी हुमायूनने तिचं रक्षण केलं, आणि राखीचं वचन पाळलं. ही ऐतिहासिक कथा



हिंदू–मुस्लीम सौहार्दाचेही उदाहरण आहे.यम आणि यमुनाचं नातं : एका पुराणकथेनुसार, यमदेवाने यमुनेला भेट दिली, तेव्हा तिने त्याच्या हातावर राखी बांधली. यमदेव प्रसन्न होऊन तिला अमरत्वाचं वरदान देतो. त्यामुळे हा सण दीर्घायुष्याच्या इच्छेशीही संबंधित आहे.

प्रत्येक बहिणीसाठी हा सण खास असतो. अनेक बहिणी या दिवसाची आतुरतेने वाट पाहतात. राखी विकत घेणं, भावासाठी खास गोडधोड तयार करणं, त्याच्यासाठी शुभेच्छा लिहून त्याला काहीतरी खास भेट देणं या सगळ्या गोष्टी बहिणीकडून मनापासून केल्या जातात. भाऊ देखील या दिवशी बहिणीला एखादी खास भेट देतो, आणि जरी तो काही बोलत नसेल, तरी त्याच्या डोळ्यांतून दिसणारं प्रेम आणि जिव्हाळा हेच त्याचं वचन असतं. आजच्या धावपळीच्या काळात जरी बहुतांश लोक एकमेकांपासून दूर राहत असले, तरी रक्षाबंधनाच्या निमित्ताने ते पुन्हा एकत्र येतात. बहिणी आपले घर सोडून दूर शहरात किंवा देशात असतात, काही वेळा भावदेखील परदेशात असतो पण राखी मात्र प्रत्येक अंतर पार करून पोहोचते. पत्रासोबत येणारी राखी, किंवा व्हिडिओ कॉलवर राखीचा समारंभ यामध्ये त्या गाठीचे प्रेम कमी होत नाही. उलट, त्या आठवणी अजून जास्त खोलवर रुजतात.हे नातं केवळ सख्ख्या भावंडांपुरतं मर्यादित राहिलेलं नाही. आज अनेक स्त्रिया आपल्याला भाऊसारखा वाटणाऱ्या मित्राला, शेजाऱ्याला, सहकाऱ्याला देखील राखी बांधतात. या नात्यात रक्ताची गरज लागत नाही लागतो तो फक्त



तनवीर पठाण
मो. ७९७२७४३०२६

विश्वास आणि एकमेकांच्या सुख–दुखात साथ देण्याचा हेतू.रक्षाबंधनचा सण सामाजिक दृष्टिकोनातूनही फार मोठा आहे. काही ठिकाणी बहिणी सैनिकांना, पोलिसांना राखी बांधतात – ज्या व्यक्ती देशाचं, समाजाचं रक्षण करतात त्यांना सन्मानपूर्वक राखी अर्पण केली जाते. हे दाखवतं की, हा सण केवळ कौटुंबिक न राहता एक व्यापक भावनेचा उत्सव बनतो.

रक्षाबंधन हे फक्त एका दिवसाचं नव्हे ते एका नात्याचं प्रतीक आहे. त्या एका दोरीमध्ये गुंफलेली असते बालपणाची आठवण, शाळेत एकत्र गेलेले दिवस, खेळण्यावरून झालेले भांडण, आणि त्यानंतर लगेच झालेलं गोड गळाभेट. त्या राखीत असतो आईच्या हातचं जेवण, आणि बहिणीच्या ओवाळणीच्या ताटातील गोड चव.आयुष्य पुढे जातं, माणसं मोठी होतात, जबाबदाऱ्या वाढतात, पण त्या लहानशा राखीने एकमेकांना बांधून ठेवलेलं असतं. तो धागा वर्षानुवर्षे तसाच घट्ट राहतो कधी काळवंडलेला नाही, कधी विसरलेला नाही. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात सगळं डिजिटल झालं असलं तरी भावना तशाच राहतात. राखी ऑनलाइन मागवली जाऊ शकते, गिफ्ट कुरिअरने जाऊ शकतं, व्हिडिओ कॉलवर भेटता येऊ शकतं पण मनाच्या गाभ्यात असलेलं प्रेम, आठवणी, आणि एकमेकांच्या आयुष्यातील असलेली जागा ती नेहमी तशीच असते, अनमोल, अढळ, आणि अपराजित.रक्षाबंधन म्हणजे श्रद्धा, प्रेम, आणि नात्यांवरील विश्वासाचा सण. तो आपण सर्वांनी मनापासून साजरा करावा अगदी सोपेपणाने, पण मनाच्या सर्व खोल कप्प्यांतून. कारण भाऊ– बहिणीचं नातं हे जगातलं सर्वात सुंदर नातं आहे तसं निर्मळ, तसं आणि तितकंच मजबूत.

# ३ तासांत ५० अतिक्रमणांवर हातोडा

## रस्ते झाले मोकळे, बीडमधील वाहतुकीचा अडथळा दूर, आजही मोहीम

बीड/प्रतिनिधी

बीड उपमुख्यमंत्री अजित पवार बीड दौऱ्यावर होते, त्यामुळे नगरपालिकेकडून शहरातील अतिक्रमण हटवण्यात आले. परंतु, पवार जाताच पुन्हा अतिक्रमण वाढले. शनिवारी दिव्य मराठीने उपमुख्यमंत्री अजित पवार जाताच बीडच्या रस्त्यांवर अतिक्रमण वाढले या मथळ्याखाली वृत्त प्रकाशित केले. याची दखल पालिकेने घेतली. शहरातील कॅनॉल रोड, नगर नाका, मच्छी मार्केट, राजीव गांधी चौकांतील ५० पेक्षा जास्त अतिक्रमणे ३ तासांत हटवली आहेत.

रहदारीला अडथळा करणारे सर्वच अतिक्रमण हटवले जाणार आहेत. आजही शहरात अतिक्रमण हटाव मोहीम सुरू राहणार आहे. बीड शहरातील नगर रोड, जालना रोड आणि सुभाष रोडवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले आहे. रहदारीस अडथळा निर्माण होत आहे. मंत्र्यांचा दौरा असेल तरच अतिक्रमण हटवले जाते. इतर वेळी मात्र कायम रहदारीला अडथळा निर्माण होत आहे. याप्रकरणी वृत्त प्रकाशित केल्यानंतर सकाळी ११ ते २ वाजेपर्यंत ३ तास अतिक्रमण हटाव पथक आणि जिल्हा वाहतूक शाखा यांनी संयुक्त कारवाईची मोहीम राबवली. नगर रोडवरील नगर



नाका ते नाट्यगृह रोड, राजीव गांधी चौक ते नगर नाका, नगर नाका ते धानोरा रोड, मच्छी मार्केट या भागांतील अतिक्रमण काढले. शहरातील अहिल्यानगर रोडवरील अतिक्रमण हटवण्यात आले. दिव्य मराठीत प्रकाशित बातमी. शनिवारी रहदारीला अडथळा करणारी अतिक्रमणे हटवली आहेत. मात्र दोन-चार दिवसांत पुन्हा त्या भागात अतिक्रमण होत असल्याचे आमच्या निदर्शनास आले. त्यामुळे ज्या भागातील अतिक्रमणे हटवली आहेत, तेथे पुन्हा अतिक्रमण होणार नाही, याची खबरदारी घेतली आहे. -गणेश पगारे, स्वच्छता प्रमुख बीड शहरात रहदारीस अडथळा ठरणारी सर्व अतिक्रमणे हटवण्यात येणार आहेत. त्यासाठी शहरात विशेष मोहीम राबवली जाणार आहे. नागरिक, व्यापाऱ्यांनी अतिक्रमण करू नये, केलेले अतिक्रमण स्वत: काढावे. पालिकेचे अतिक्रमण हटाव पथक शहरात कायम फिरणार आहे. शहरातील सर्व भागांत रहदारीस अडथळा ठरणारे अतिक्रमण हटवले जाणार आहे. -शैलेश फडसे, मुख्याधिकारी, बीड आज छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते कारंजा रोड, भाजी मंडई परिसरातील अतिक्रमणे हटवली जाणार आहेत. ही मोहीम मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता प्रमुख गणेश पगारे, पोलिस निरीक्षक सुभाष सानप यांच्यासह पोलिस कर्मचारी आदींनी केली.

# पालकांचे छत्र हरपले; अनाथ भावंडांना दातृत्वाचा आधार

पाटोदा/प्रतिनिधी

आठवडी बाजारात दुचाकीवरून जाणाऱ्या बाळू केशव वायकर, पत्नी लता वायकर रा. घाटेवाडी ता. पाटोदा यांचा एसटीच्या धडकेने मृत्यू झाला. अपघातानंतर अदित्य, सुदर्शन या दोन्ही मुलांच्या संगोपन आणि शिक्षणाचा प्रश्न उभा राहिला. एकजण करंजवण आश्रमशाळेत तर दुसरा गावी शिक्षण घेत होता. या मुलांच्या भवितव्याचा विचार करून पाटोदा येथील सकल मराठा समाज मदत ग्रुप व सुरेंद्र तीपटे यांनी मदतीचे आवाहन केले. त्यांच्या आवाहनाला दातृत्वाचे शेकडो हात मदतीला धावत आर्थीक पाठबळ दिले आहे.

पाटोदा शहरालगत ग्रामीण रुग्णालयासमोरील शहीद चौकात जुलै महिण्यात घाटेवाडीचे ऊसतोड मजूर बाळू केशव वायकर (४२) आणि लता बाळू वायकर (४०) यांचा अपघाती मृत्यू झाला होता. यामुळे सुदर्शन (१३) व आदित्य (११) या दोन अल्पवयीन मुलांवर संकटांचा डोंगर कोसळला. अपघातानंतर या दोन्ही मुलांच्या संगोपन आणि शिक्षणाचा प्रश्न उभा राहिला होता. ही बाब पाटोदा येथील सकल मराठा समाज मदत ग्रुप व सुरेंद्र तीपटे यांनी मदतीचे आवाहन केले. यातून अल्पावधीत आवाहनाला समाजाच्या सर्व घटकांतून मोठा प्रतिसाद मिळत अल्पावधीत तब्बल ६ लाख ७६ हजार ७०० रुपयांचा निधी संकलीत झाला आहे. दोघांच्या संयुक्त खात्यात रक्कम जमा : दातृत्वातून उभ्या झालेल्या रकमेतून बहुतांश रक्कम या दोन्ही भावांच्या संयुक्त बँक खात्यात जमा करण्यात आली आहे. तर काही रक्कम फिक्स डिपॉझिट स्वरूपात ठेवण्यात आली. त्यामुळे त्यांच्या शिक्षणाचा खर्च दीर्घकाळ भागवता येईल असे नियोजन करण्यात आले आहे. यामुळे त्यांच्या भवितव्याचा शैक्षणिक प्रश्न काही अंशी मार्गी लागला आहे. दात्यांचा आर्थिक हातभार : आमदार सुरेश धस १ लाख



बँकेत फिक्स डिपॉझिट केले आहे. तर सकल मराठा मदत फाउंडेशन ८४ हजार ७००, पांढरी ग्रामस्थ २२ हजार, दोन्ही मिळून १ लाख ६ हजार ७०० सुरेंद्र बाबा तीपटे यांच्या माध्यमातून, अज्ञात नेता २० हजार, परमेश्वर येवले १ लाख, महावितरण पदाधिकारी २५ हजार, पाटोदा तालुक्यातील ग्रामस्थ व मराठा सेवक टीम ३ लाख २५ हजार अशी एकूण ६ लाख ७६ हजार ७०० रूपयांचा निधी संकलीत झाला आहे.सर्व समाजबांधवांचे दातृत्व मानवतेचा आरसा या मदत उपक्रमात सर्व समाजघटकांनी सहभाग घेतला. जात, पंथ, राजकीय भेद न बाळगता सर्वांनी या दोन भावांच्या पाठीशी उभे राहत मानवतेचा खरा आरसा दाखवला. या प्रसंगी गावकऱ्यांनी सांगितले की खरोखरच हे कुटुंबाची परिस्थिती अतिशय बिकट होती. त्यातच आई-वडील गमावल्यामुळे या दोन्ही भावंडांचा आधार कायमचा गेला होता. त्यांच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला होता. परंतु सर्व समाज घटकांनी या अनाथ भावंडांच्या पाठीशी उभा राहून खऱ्या अर्थाने मानवतेचा आरसा दाखवल्याचे ग्रामस्थांनी व्यक्त केले.

# कापूस, सोयाबीनवर पडला रोग; शेतकऱ्यांना फवारणीचा भुर्दंड

## हलका पाऊस, ढगाळ वातावरणाचा होतो पिकांवर परिणाम



धारूर/प्रतिनिधी

या वर्षी तालुक्यात ९० टक्के पेक्षा अधिक खरिपाची पेरणी झाली आहे . मागील आठदिवसापासून भिज पावसाची हजेरी व ढगाळ वातावरणामुळे कापूस, सोयाबीन पिकावर मावा तुडतुडे अशा रस शोषण करणाऱ्या किडीचा प्रादुर्भाव वाढल्यामुळे पिकाची वाढ खुंटली आहे .शेतकरी पावसाची उघडीप कधी होईल याच्या प्रतिक्षेत आहेत .धारूर तालुक्यात यावर्षी मृग नक्षत्राच्या दुसऱ्या आठवड्यात ५० टक्के खरिप पेरण्या झाल्या होत्या . ''राहिलेल्या ५० टक्के जुलै महिन्यात पेरण्या झाल्या होत्या. खरिपाचे सर्व साधारण क्षेत्र हे ४१ हजार १८२ एवढे आहे. त्यापैकी ऑगस्ट आठवड्यापर्यंत ३९ हजार १०० हेक्टरवर खरिपाची पेरणी झाली आहे. गतवर्षी २३ हजार ७३३ हेक्टरवर कापसाची लागवड झाली होती. त्यात यावर्षी ५ हजार हेक्टर घर होवून १८ हजार ४६१ एवढी पेरणी झाली आहे.

तालुक्यात सोयाबीनचे सरासरी ७ हजार ९१६ हेक्टर क्षेत्र आहे. यावर्षी १६ हजार ८१ एवढा सोयाबीनचा पेरा झाला आहे. बाजरीच्या पिकामध्ये दरवर्षी घट होत आहे. सरासरी ४ हजार ७८८ क्षेत्र असताना ५० टक्क्याच्या जवळपास म्हणजे २ हजार ६१८ हेक्टर बाजरीची पिकाची पेरणी झाली आहे . मुग २४८ , उडीद १७२ , भुईमुग २४ , तुर १३४४ तर मका १०७ हेक्टर अशी सर्वसाधारण पेरणी झाली आहे .डोंगरपट्टा परिसरामध्ये कापसाचे क्षेत्र आहे तर पठारी भागात सोयाबीन क्षेत्र वाढले आहे. मागील आठदिवसांपासून पावसाने बऱ्यापैकी हजेरी लावली आहे.सध्या पिके वाढीच्या अवस्थेत आहेत. परंतु सतत ढगाळ वातावरण भीज पावसाच्या हजेरीमुळे कापूस, सोयाबीन, उडीद , मुग या पिकावर तुडतुडे, मावा यासह रस शोषण करणाऱ्या किडीचा प्रादुर्भाव वाढू लागला आहे .सतत पावसामुळे शेतकऱ्यांना फवारणी तसेच अंतर्मशागतीस अडथळे येत आहेत. पिकाची वाढ खुंटू लागली आहे. अशीच काही दिवस परिस्थिती राहिल्यास खरिपाची पिके हातची जाण्याची भीती शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे एवढा मोठा खर्च करून पिकास मशागती करण्याची शेतकऱ्याची अपेक्षा असताना सतत पावसामुळे मात्र अडथळे येत आहेत. खते देणे , फवारणी कामांनाही अडचण मागील आठ दिवसांपासून ढगाळ वातावरण व भिज पावसाच्या हजेरीमुळे सूर्यदर्शनही कमी झाले आहे. या मुळे अंतर मशागतीची कामे रखडली आहेत. पिकास खत देणे , फवारणी करणे ही वेळेत होणे आवश्यक आहे . मशागती रखडल्याने खरीप ची पिके धोक्यात येऊ लागले आहेत असे येथील शेतकरी बन्सी भोसले यांनी सांगीतले. रोगामुळे उत्पादनात घट येण्याची भीती आहे.

# राज्यातील व्यवसाय कर रद्द करा व्यापारी महासंघाकडून निवेदन

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन केली चर्चा

बीड/प्रतिनिधी

राज्यातील व्यापाऱ्यांकडून घेतला जाणारा व्यवसाय कर रद्द करावा तसेच विज वितरण कंपनीकडून सोलारबाबत बदल करण्यात आलेले नियम रद्द करावेत यासंबंधीच्या मागण्या व्यापाऱ्यांच्या वतीने पालकमंत्री अजित पवार यांच्याकडे करण्यात आल्या.

पालकमंत्री अजित पवार हे दोन दिवस बीड दौऱ्यावर होते. या दरम्यान बीडमधील व्यापारी, उद्योजकांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. व्यापाऱ्यांच्या वतीने बीड जिल्हा व्यापारी महासंघाचे कार्याध्यक्ष अशोक



शेटे यांनी सोलार निर्मित युनिट वापरा विषयी वीज वितरण कंपनीने बदल केलेले नियम रद्द करावे, वीज बिलात लागणारे डिमांड चार्जेस व व्हिलिंग चार्जेस रद्द करावे तसेच राज्यभरातील व्यवसायिकांना लावला जाणारा व्यवसाय कर रद्द करावा व बीड मध्ये व्यापारी भवन देण्यात यावे अशी मागणी केली. यावेळी बीडमध्ये अतिरिक्त एमआयडीसीची स्थापना करावी, एमआयडीसीसाठी माजलगाव बॅक वॉटरचे पाणी उपलब्ध करुन द्यावे, राष्ट्रीय महामार्गापासून एमआयडीसीपर्यंत नवीन रस्ता तयार करावा, एमआयडीसीसाठी वेगळे सबस्टेशन कार्यान्वीत करावे तसेच स्वतंत्र पोलिस चौकी स्थापन करावे याबरोबरच परिसरात झालेले अतिक्रमण हटवावे या मागण्या ऑइल मिल संघटनेचे अध्यक्ष राजीव संचेती यांनी केल्या. तसेच माजलगाव येथील मुख्य बाजारपेठेच्या रस्त्याचा प्रश्न व्यापारी महासंघाचे माजलगाव तालुकाध्यक्ष सुरेंद्र रेदासणी यांनी मांडला. यावेळी जिल्हा व्यापारी महासंघाचे कार्याध्यक्ष अशोक शेटे, शहराध्यक्ष प्रकाश कानगावकर, वाय जनार्धन राव, जवाहरलाल कांकरिया, शांतीलाल पटेल, जिनींग असोसिएशनचे अध्यक्ष अमृत सारडा, बी.बी.जाधव, गोपाल कासट, माधव निर्मळ यांची उपस्थिती होती.

# नशेत तरुणाचा कुटुंबीयांवर हल्ला; आजीचा मृत्य

## आई-वडील जखमी:परळी शहरातील तलाबकट्टा भागात घटनेने खळबळ

परळी/प्रतिनिधी

नशेमध्ये २० वर्षीय तरुणाने कोंबड्या कापण्याच्या सुऱ्याने कुटुंबीयांवर हल्ला केला. यात ९० वर्षीय आजीचा मृत्यू झाला, तर आई, वडील जखमी झाले. परळी शहरात शनिवारी सायंकाळी ही घटना घडली. या प्रकरणी उशिरापर्यंत संभाजीनगर पोलिसांत गुन्हा नोंदीची प्रक्रिया सुरू होती. पोलिसांनी तरुणाला ताब्यात घेतले आहे. अरबाज कुरेशी असे या तरुणाचे नाव आहे.

परळी शहरातील तलाबकट्टा भागातील रहिवासी रमजान कुरेशी यांचा कोंबडी मांस विक्रीचा व्यवसाय आहे. त्यांचा मुलगा अरबाज कुरेशी हा दारू, व्हाइटनर अशा प्रकारच्या नशेत असायचा. यातून वाद व्हायचे. यातच शनिवारी सायंकाळी ५.३० वाजता घरी आल्यानंतर त्याने नशेमध्ये घरातील सर्व सदस्यांवर कोंबड्या कापायच्या कोयत्याने हल्ला केला. यात आजी जुबेदा इब्राहिम कुरेशी (९०), आई समीना कुरेशी (४५), वडील रमजान कुरेशी (५०) हे गंभीर जखमी झाले. जखमींना नागरिकांनी परळी उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असता तेथे प्राथमिक उपचार केल्यानंतर त्यांना अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात हलवण्यात आले. रात्री ७.३० नंतर या घटनेतील जखमी आजी जुबेदा कुरेशी यांचा मृत्यू झाला. संभाजीनगर पोलिसांनी आरोपीस ताब्यात घेतले आहे. आरोपी होता घरातच आपल्याच आजी, आई-वडिलांवर कोयत्याने जीवघेणा हल्ला केल्यानंतर अरबाज हा आपल्या घरातच थांबला होता. नागरिकांनी घटनेची माहिती पोलिसांना दिल्यानंतर संभाजीनगर पोलिस घटनास्थळी दाखल झाले व त्यांनी घराशेजारून आरोपीस ताब्यात घेतले.

# भगवान जिव्हेश्वर जन्मोत्सव उत्साहात

## कावड आणि शोभायात्रेने सप्ताहाची सांगता



परळी/प्रतिनिधी

परळीत समस्त स्वकुळ साळी समाज बांधवांच्या वतीने आद्यवस्त्र निर्माता शिवपुत्र भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमीत्त जिव्हेश्वर विजय ग्रंथाचे पारायण आयोजित करण्यात आले होते.गुरूवार रोजी विविध धार्मिक,सांस्कृतिक कार्यक्रम व कावड,शोभायात्रेने जन्मोत्सवाची सांगता झाली.

शहरातील संत जगमित्र नागा मंदिर येथे गुरूवार रोजी सकाळी ५.४६ वाजता जन्मोत्सव त्यानंतर पाळणा व आरती करण्यात आली. चैतन्य मानकर व मयूर आरबुने यांच्या जन्मोत्सव पूजा करण्यात आली.

त्यानंतर मंदिर सभागृहात रांगोळी स्पर्धा घेण्यात आल्या. दुपारी तीन ते पाच पर्यंत जिव्हेश्वर चरित्र कथा सारामृत स्वाती विलास ताटे व त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रवचन सादर केले. सायंकाळी ५ वाजता स्पर्धेतील स्पर्धकांना बक्षीस वितरण व गायत्री गोविंद शिवगण, समर्थ कुचेकर, प्रा.अक्षय पोटे, निकीता मयूर आरबुने यांचा गौरव करण्यात आला. सायंकाळी साडेसहाच्या सुमारास सायं आरती होऊन कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परळी साळी समाजाचे अध्यक्ष बालासाहेब बडकस, सचिव नितीन भंडारे, विलास ताटे, धनंजय आरबुने, बालासाहेब पोरे आदींनी परिश्रम घेतले.

# चंद्र-सूर्य, तारे असेपर्यंत नाथांची कीर्ती अजरामर- पाचपोर महाराज

## गोरक्षनाथ टेकडी येथे किसन बाबा यांच्या पुण्यतिथीला जनसागर

बीड/प्रतिनिधी

गोरक्षनाथ टेकडीला या परिसरात वेगळे महत्त्व आहे. नाथपंथीयांचे कार्य समाजोपयोगी आहे. त्यामुळे या टेकडीला मानणारा वर्ग मोठा आहे. जोपर्यंत सूर्य-चंद्र-तारे आहेत, तोपर्यंत नाथांची कीर्ती अजरामर राहील, असे गौरवोद्गार पाचपोर महाराज यांनी काढले. शनिवारी गोरक्षनाथ टेकडी येथे किसान बाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता झाली. या सांगता समारंभास लाखोंचा जनसागर उसळला होता.

विसाव्या शतकातील महान सद्गुरू संत किसन बाबा महाराज यांच्या २७व्या पुण्यतिथीनिमित्त गुरुवर्य शांतिब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे अखंड हरिनाम सप्ताह व गुरुवर्य किसन बाबा महाराज यांच्या २७व्या पुण्यतिथीनिमित्त शनिवारी पहाटे गुरुवर्य किसन बाबा महाराज यांच्या समाधीचे विधिवत गुरुपूजन महंत गुरुवर्य शांतिब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांच्या हस्ते



करण्यात आले. सकाळी १२ वाजता विदर्भरत्न रामायणाचार्य संजय महाराज पाचपोर (बुलढाणा) यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता झाली. या वेळी नानाभाऊ लांडे महाराज, लक्ष्मीकांत कदम महाराज, मृदंग साथ धनंजय महाराज बोंगाणे, अनिकेत महाराज लांडे यांनी मृदंग साथ दिली. अभंग विवेचन करताना पाचपोर महाराज यांनी सांगितले की नाथांनी आपले आयुष्य गोरगरिबांच्या हितासाठी अर्पण केले. गोरगरिबांच्या जीवनात सुखाचे दिवस यावेत म्हणून नाथांनी आयुष्य घातले. आदिनाथ, मच्छिंद्रनाथ, गोरक्षनाथ, साधू महाराज, गुरुवर्य किसन बाबा महाराज, शांतिब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांनी आपले आयुष्य जनसामान्य माणसासाठी घातले. म्हणून जोपर्यंत या पृथ्वीवर चंद्र-सूर्य आहेत, तोपर्यंत नाथांची कीर्ती अजरामर आहे. नाथांचा लोककल्याणाचा वारसा गुरुवर्य शांतिब्रह्म नवनाथ बाबा महाराज चालवत आहेत, असे प्रतिपादन पाचपोर महाराज यांनी केले. या वेळी टाळकरी, वारकरी, भाविक-भक्तांनी प्रचंड गर्दी केली होती. टेकडी येथे दीड एकर वॉटरप्रूफ मंडप गोरक्षनाथ टेकडी येथे किसन बाबा यांच्या पुण्यतिथीला बीड जिल्ह्यातून जनसागर उसळला होता. टेकडी परिसरात दीड एकर वॉटरप्रूफ मंडप उभारला होता. याशिवाय सभामंडप भरून भाविक बाहेरील परिसरात बसून कीर्तन श्रवण करत होते. जेथे जागा मिळेल तेथे भाविक-भक्त उभे होते. कीर्तन संपल्यानंतर महाप्रसादाच्या महापंगती बसवण्यात आल्या. परिसरातील ट्रॅक्टर, पिकअपच्या साह्याने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. बीड जिल्ह्यातून जनसागर उसळला होता. टेकडी परिसरात दीड एकर वॉटरप्रूफ मंडप उभारला होता.

# पर्यावरण वाचवण्यासाठी एक तरी झाड लावावे -नगराध्यक्षा दीपाली जाधव

पाटोदा/प्रतिनिधी

पर्यावरणाचे संतुलन राखायचे असेल, हवामानातील बिघाड थांबवायचा असेल तर प्रत्येकाने किमान एक तरी झाड लावलेच पाहिजे आणि ते जगवले पाहिजे, असे प्रतिपादन नगराध्यक्षा दिपाली जाधव यांनी केले. पाटोदा शहरात हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र या राज्यस्तरीय अभियानाअंतर्गत वृक्षारोपण मोहिमेचा शुभारंभ गुरुवार (७ ऑगस्ट) रोजी पासून मागासवर्गीय मुलांचे-मुलींचे वस्तीगृह परिसरात करण्यात आला.

कार्यक्रमाला उपविभागीय अधिकारी श्रीमती वसीमा शेख, मुख्याधिकारी अभय कुमार जोशी, नगरसेवक महादेव जाधव, तसेच सभापती नगरसेवक, अधिकारी, कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते. नगराध्यक्षा दिपाली जाधव यांनी सांगितले की, पाटोदा शहराला हिरवाईने नटवण्यासाठी नगरपरिषद कटिबद्ध आहे. या मोहिमेत केवळ वृक्षारोपण न करता झाडांचे



संगोपन हा देखील आमचा प्राधान्यक्रम आहे. नागरिक, शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा. याप्रसंगी पाटोदा नगरपंचायत चे मुख्याधिकारी अभय कुमार जोशी यांनी म्हटले, नगरपरिषदेच्या हद्दीत ६००० वृक्षलागवडीचे उद्दिष्ट ठेवले आहे. यासाठी पाण्याची व्यवस्था, खड्डे खणणे, रोपांची निवड आणि देखरेख यासाठी सर्व यंत्रणा सज्ज आहेत अध्यक्षीय समारोप उपविभागीय अधिकारी वसीमा शेख यांनी केला.

# वन्यप्राण्यांमुळे खरीप पिकांचे नुकसान; शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई द्या

## खासदार बजरंग सोनवणेंनी संसदेत मांडला प्रश्न

केज/प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात हरीण, रानडुक्करे व इतर वन्य प्राण्यांमुळे मोठ्या प्रमाणावर पिकांचे नुकसान होत आहे. नैसर्गिक आपत्ती सोबतच जंगली प्राणी उपद्रवामुळे शेतीमालाचे नुकसान बीड जिल्ह्यातील कांही भागात मोठ्या प्रमाणात होत असते. ही चिंतेची बाब आहे. हा उपद्रव रोकण्यासाठी उपाय योजना करण्याची गरज आहे. नुकसानग्रस्त शेतक-यांना पिकांची नुकसान भरपाई मिळत नाही. इतर राज्यांमधे हत्तीने पिकाचे नुकसान केले तर भरपाई मिळते, पण आमच्या शेतकऱ्यांना हरीण, रानडुक्कर यांनी नुकसान केल्यानंतर नुकसान भरपाई का मिळत नाही?, असा सवाल उपस्थित करत वन्यप्राण्यांकडून होणाऱ्या पिकांच्या नुकसानीची भरपाई मिळावी तसेच हा उपद्रव रोकण्यासाठी शाश्वत उपाययोजना कराव्यात,अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी संसदेत केली. जिल्ह्यातील शेतकरीपुत्र म्हणून खा.सोनवणे



यांची ओळख असून ते वारंवार शेती प्रश्नावर आवाज उठवित आहेत.

कृषी व शेतकरी कल्याण राज्यमंत्री रामनाथ ठाकुर यांनी दिलेल्या लेखी उत्तरात म्हटले आहे, पंतप्रधान पीक विमा योजनेत नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानीस संरक्षण मिळते तसेच शेतीला कुंपण घालण्यासाठी राज्य सरकारे उपाययोजना करतात मात्र, जंगली प्राण्यांमुळे होणारे नुकसान हे टाळता येण्यासारखे असल्याने आधी या योजनेत त्याचा समावेश नव्हता. पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय तसेच विविध राज्य सरकारांच्या विनंतीनंतर, राज्य सरकारांना या नुकसानीचा ''ड-ऑन कव्हर'' स्वरूपात समावेश करण्याची परवानगी देण्यात आली आहे.तथापि, महाराष्ट्र सरकारने आतापर्यंत हा पर्याय लागू केलेला नाही. तसेच, केंद्र सरकारकडून ''डेव्हलपमेंट ऑफ वाइल्डलाईफ हॅबिटॅट्स'', ''प्रोजेक्ट टायगर'' आणि ''प्रोजेक्ट एलिफंट'' या योजनांतर्गत राज्यांना आर्थिक मदत दिली जाते. यामध्ये काटेरी तारांचे कुंपण, सोलार ऊर्जेवर चालणारे कुंपण, कॅक्टसची जिवंत फेन्सिंग, भिंती इत्यादींची उभारणी करून पिकांमध्ये जंगली प्राण्यांची घुसखोरी रोखण्याच्या उपायांचा समावेश आहे. बीड जिल्ह्यात हरीण, रानडुकरांमुळे शेतीचे मोठे नुकसान होत आहे. शेतकऱ्यांना वन्यप्राण्याने केलेल्या नुकसानीची भरपाई मिळावी, शिवाय पिक वाचविण्यासाठी व्यवस्था निर्माण करावी, अशी मागणी खा. सोनवणे यांनी केली आहे. शासनाकडे या महत्त्वाच्या केल्या मागण्या महाराष्ट्रात पंतप्रधान पीक विमा योजनेच्या ड-ऑन कव्हरमध्ये हरिण व रानडुकरांमुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानीचा समावेश करण्यास तात्काळ मान्यता द्यावी. हा पर्याय लागू झाल्यानंतर शेतकऱ्यांना त्याबाबत योग्य ती माहिती व मार्गदर्शन उपलब्ध करून द्यावे, जेणेकरून ते वेळेत या योजनेचा लाभ घेऊ शकतील. केंद्र व राज्य योजनांद्वारे उपलब्ध असलेल्या सोलार किंवा तारांचे कुंपण, भिंत बांधकाम इत्यादी प्रतिबंधात्मक उपायांनाही अधिक बळकटी द्यावी.

# पिंपळवंडी शिवारात बिबट्यांचा धुमाकूळ एका शेळीचा घेतला बळी

पिंपळवंडी /प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी व शिरूर तालुक्यातील पांगरी,जाटनांदुर,खोपटी परिसरामध्ये बिबट्यांचा मोठ्या प्रमाणात संचार वाढला असून शेतकऱ्यांच्या पशुधनावर,त्यामध्ये बैल,गाय,वासरे व शेळ्यावर हल्ले करून जखमी व ठार करण्याच्या घटना सतत घडू लागल्याने परिसरातील पशुधन पालकांमध्ये घबराटीचे व भीतीचे वातावरण निर्माण झाले असून वन विभागाने बिबट्याचा तात्काळ बंदोबस्त करून शेतकऱ्यांना सहकार्य करावे,अशी परिसरातील शेतकऱ्याकडून अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

पिंपळवंडी येथील शेतकरी अशोक बाजीराव पवार हे नेहमी प्रमाणे कुंभारदारा शेत शिवारात दि.९/८/२०२५ रोजी शेळ्या चारण्यासाठी गेले असता दुपारी २:३० वाजण्याच्या सुमारास बिबट्याने अचानक एका शेळीवर हल्ला केला, त्या हल्ल्यात शेळी जागेवरच गतप्राण झाली. त्यामुळे अशोक पवार यांचे ३० हजाराचे आर्थिक नुकसान झाले आहे. याबद्दल त्यांनी वनविभागाला अर्ज देऊन कळविले आहे.याबद्दल त्यांना आर्थिक नुकसान



भरपाई मिळावी अशी अनेकांनी अशा व्यक्त केली आहे.पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी,जरेवाडी,बेदरवाडी, सरदवाडी, चंद्रेवाडी,धोपटवाडी, डोंगरकिन्ही, खोपटी,पांगरी हा डोंगरपट्ट्याचा परिसर असून या परिसरात बिबट्याची संख्या वाढत चालली असून ही संख्या अशीच वाढत राहिली तर,शेतकऱ्यांपुढे मोठा प्रश्न निर्माण होऊन जनावरे बिबट्याच्या हल्ल्यापासून कसे वाचवावेत व दुभती जनावरे पाळणे सुद्धा मुश्किल होणार आहे.यापूर्वीही धोपटवाडी, सरदवाडी, जरेवाडी, चंद्रेवाडी,हांडेवाडी येथील शेतकऱ्यांची बैल,गाय,वासरे,शेळ्या बिबट्यांनी हल्ले करून बळी घेतल्याचे प्रकार घडले आहेत.यावर वन विभागाने ठोस उपाययोजना करून शेतकऱ्यांच्या पशुधनाचे संरक्षण करून शेतकऱ्यांना आधार द्यावा.याबाबत वन विभागाने सतर्क राहून दक्षता घ्यावी अशी ही मागणी जोर धरत आहे.

# सिंदफणा प्रकल्प यंदाही ओव्हरफ्लो; नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा

## शिरूर तालुक्यातील उन्हाळ्यातील पाणी प्रश्न मिटला



शिरूर/प्रतिनिधी

सिंदफणा प्रकल्प १०० टक्के क्षमतेने भरल्याने नदीपात्रात पाणी सोडण्यात आले आहे. त्यामुळे नदीकाठच्या गावांना प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे. मागील दोन दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे प्रकल्पात झपाट्याने पाणीसाठा वाढला. त्यामुळे प्रकल्पातून पाणी विसर्ग सुरू करण्यात आला आहे.

मे महिन्यात १९० मिमी पाऊस झाला. एक जून ते ९ ऑगस्टदरम्यान २१२.९ मिमी पावसाची नोंद झाली. यामुळे सिंदफणा प्रकल्पासह इतर प्रकल्पही भरले. मागील पंधरवड्यात प्रकल्प ८० टक्के भरलेला होता. मात्र, या आठवड्यात पावसाचा जोर कायम राहिल्याने प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरला आहे. प्रशासनाने गोमळवाडा, कोळवाडी, शिरूर, ब्रह्मनाथ येळंब, राळेसांगवी, नांदिवली, निमगाव मायंबा, माळेवाडी, हाजीपुर-गाजिपुर, धारवंटा, साक्षाळपिंप्री या गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

नागरिकांनी नदीपात्रात जाण्यास मनाई करण्यात आली आहे. खोल भागात राहणाऱ्यांना स्थलांतराचे आदेश देण्यात आले आहेत. तहसीलदार सुरेश घोळवे यांनी प्रकल्पाला भेट दिली पर्यटकांची गर्दी टाळण्यासाठी उपाययोजना सुरू करण्यात आल्या आहेत. नदीपात्रातील पाणीपातळी कधीही वाढू शकते. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन तहसीलदारांनी केले.

# शाळा व्यवस्थापन समितीच्या दोन वर्षांच्या लढ्यास यश

## पोर्टलवरून बंद केलेले राजेगाव जि.प. शाळेचे ६ वी, ७ वीचे वर्ग सुरू

माजलगाव/प्रतिनिधी

राजेगाव येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेतील बंद असलेले ५ वी ते ७ वी पर्यंतचे वर्ग पुन्हा सुरु करावेत अशी मागणी ग्रामस्थांची होती. सन २०१६-१७ मध्ये शाळा व्यवस्थापन समितीने ५ वीचा वर्ग सुरु केला. त्यानंतर ६ वी ७ वीचाही वर्ग सुरु करावा अशी ग्रामस्थांची मागणी होती. याच मागणीसाठी शाळा व्यवस्थापन समितीने दोन वर्ष शासन-प्रशासन दरबारी पाठपूरावा केला. अखेर या प्रयत्नास यश आले असून ६ वी ७ वीचा वर्ग सुरु करण्या संदर्भात शासनस्तरावरून मान्यता मिळाली आहे.

शासनाच्या ऑनलाईन पोर्टलवर विद्यार्थ्यांची नोंद करून ६ वी व ७ वीचे वर्ग पुन्हा सुरू करण्यात आले. हे प्रकरण खाजगी संस्थेने



कोर्टात नेले असून, शाळा समितीने हायकोर्टात अपील करण्याचा निर्णय घेतला आहे. कोर्टातही विजय मिळेल, असा विश्वास व्यक्त केला आहे. जिल्ह्यातील अनेक जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थी संख्या कमी होत असताना, राजेगाव शाळेतील विद्यार्थी संख्या एका वर्षात ८१ वरून १६१ झाली आहे. २०२३-२४ मध्ये ३ पदे असलेल्या शाळेत २०२५-२६ मध्ये ८ पदे निर्माण होणार आहेत.लोकसहभागातून केला शाळेचा विकास शाळेच्या प्रगतीसाठी दानशूर व्यक्ती, सामाजिक संस्था, पालक, शिक्षक आणि शाळा समितीने मिळून भौतिक सुविधा उभारल्या आहेत.

शाळेत आरो फिल्टरद्वारे पिण्याचे पाणी, सौर पॅनलद्वारे २४ तास वीज, प्रत्येक वर्गात कुलर, बोलक्या भिंती, सीसीटीव्ही कॅमेरे, फ्रिज, अतिक्रमणमुक्त परिसर, परसबाग आणि वृक्ष लागवड करण्यात आली आहे. शाळा व्यवस्थापन समिती, पालक आणि शिक्षकांनी विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देऊन आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून त्यांना प्रगत करण्याचा संकल्प केला आहे.

# महादेव मुंडे हत्या प्रकरण: एसआयटीकडून तपास सुरू

## अंबाजोगाई केले मुख्यालय; भाऊ, वडिलांचा नोंदवला जबाब

बीड/प्रतिनिधी

महादेव मुंडे हत्या प्रकरणात विशेष तपास पथकाकडून आता तपास सुरू केला गेला आहे. शुक्रवारी मृत महादेव यांचे वडील व भाऊ यांचा अंबाजोगाई येथे एसआयटीच्या पथकाने जबाब नोंदवला. त्यांच्या जबाबात त्यांनी काय म्हटले आहे हे मात्र समोर आलेले नाही.

परळी येथील व्यापारी महादेव मुंडे यांची सुमारे २० महिन्यांपूर्वी निर्घृण पद्धतीने हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात आतापर्यंत ९ तपास अधिकारी बदलूनही आरोपींना शोधण्यात यश आलेले नाही. संतोष देशमुखांच्या हत्येनंतर हे प्रकरण समोर आले व सध्या ते राज्यभर गाजत आहे. विधिमंडळ व संसदेतही यावर प्रश्न उपस्थित झाले होते. आयपीएस पंकज कुमावत यांच्या अध्यक्षतेखाली असलेले विशेष पथक याचा तपास करत आहे. पथकाने अंबाजोगाई हे मुख्यालय केले आहे. तिथूनच तपासाची सूत्रे हलवली जात आहेत. दरम्यान, शुक्रवारी महादेव मुंडे यांचे वडील दत्तात्रय मुंडे व भाऊ अशोक मुंडे यांचा जबाब नोंदवला गेला. पीआय संतोष साबळे, एपीआय भार्गव सपकाळ यांच्या उपस्थितीत हा जबाब नोंदवला गेला.

# वैद्यनाथ बँकेच्या निवडणुकीत ३७.५ टक्के मतदान:मंगळवारी मतमोजणी

## ४३ हजार ९६३ मतदारांपैकी १६ हजार २८७ मतदारांनी बजावला हक्क

परळी/प्रतिनिधी

परळी. दि वैद्यनाथ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या संचालक मंडळासाठी रविवारी मतदान पार पडले. एकूण ४३ हजार ९६२ मतदारांपैकी १६ हजार २८७ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. मतदानाची टक्केवारी ३७.५ टक्के इतकी झाली.

या निवडणुकीसाठी १३ जागांसाठी मतदान झाले. सर्वसाधारण मतदार संघात १२ जागांसाठी १४ उमेदवार, तर विमुक्त जाती भटक्या जमाती मतदार संघात १ जागेसाठी २ उमेदवार रिंगणात आहेत. मतदानासाठी बीड, लातूर, धाराशिव, सोलापूर, परभणी,



जालना, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, जळगाव, पुणे, मुंबई, नांदेड आणि अहिल्यानगर या जिल्ह्यांमध्ये १०८ मतदान केंद्रे उभारण्यात आली होती. मतदान प्रक्रिया शांततेत पार पडल्याची माहिती निवडणूक अधिकारी समृत जाधव यांनी दिली. विरोधकांना १७ पैकी फक्त ३ जागांवर उमेदवार उभे करता आल्याने मतदारांमध्ये उत्साह कमी दिसून आला. त्यामुळे मतदानाची टक्केवारी घटल्याची चर्चा होती. या निवडणुकीची मतमोजणी मंगळवारी होणार आहे. पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे यांच्या पॅनेलचे वर्चस्व पुन्हा दिसेल, अशी चर्चा परळी दि वैद्यनाथ बँकेच्या मतदारांमधून होत आहे.

# प्रतिकूल परिस्थितीमध्ये सर्वगुणसंपन्न विद्यार्थी घडवण्याचे कार्य कौतुकास्पद -मिरा गांधले

## आदिवासी समाजाने अज्ञानाशी बंड पुकारावे- सखाराम वनवे

वडवणी/प्रतिनिधी

आज ९ ऑगस्ट हा सर्वत्र जागतिक आदिवासी दिन म्हणून,मोठ्या उत्साहामध्ये साजरा करण्यात येत आहे.ज्या आदिवासी समाज बांधवांच्या संस्कृतीने,त्यांच्या चाली-रीती,रूढी-परंपरा यामू पर्यावरणास पूरक अशा आहेत. पर्यावरणाचा खऱ्या अर्थाने, समतोल राखण्याचं काम समस्त आदिवासी बांधव करत आहेत. त्यांच्या कलेनुसार, कलाविष्कारांचा,संस्कृतीचे जतन व्हावे म्हणून आदिवासी दिन हा साजरा करण्यात येतो.त्या निमित्ताने शासकीय माध्यमिक आश्रम शाळा थेटेगव्हाण ता. धारूर जि.बीड येथे जागतिक आदिवासी दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

शाळेचे मुख्याध्यापक श्री सखाराम वनवे सर शाळेतील शिक्षक व शिक्षक इतर कर्मचारी यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेमध्ये जागतिक आदिवासी दिनाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी विद्यार्थ्यांना आणि समस्त पालक वर्गांना मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेल्या जिल्हा परिषद च्या माजी अध्यक्ष मीराताई गांधले यांनी वरील उद्गार काढले तर अध्यक्षीय भाषणा तून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन




करताना शाळेचे मुख्याध्यापक श्री सखाराम वनवे सर यांनी आदिवासी समाजाने आता शिक्षणरूपी असलेल्या अज्ञानाशी बंड पुकारावे असे आव्हान उपस्थित विद्यार्थी आणि पालकांना केले केले प्रथम व्यासपीठावरील प्रमुख अतिथी मीराताई गांधले शाळेचा माजी विद्यार्थी एव्हरेस्ट वीर सुग्रीव मंदे शाळेचे मुख्याध्यापक,समस्त पालक या सर्वांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून,सर्व आदिवासी क्रांतिकारकांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.याप्रसंगी शाळेतील विद्यार्थी,श्यामबाला वाकतकर रेखा अंभोरे पूजा साबळे आदी विद्यार्थ्यांनी जागतिक आदिवासी दिनानिमित्त आपले मनोगत व्यक्त केले.यानंतर शाळेतील शिक्षिका श्रीमती सारिका डोंगरे मॅडम व पूनम लांब मॅडम यांनी गेली दहा-बारा दिवसापासून आदिवासी संस्कृतीच्या गाण्यांवर मुलींकडून सराव करून घेतला होता. त्या आदिवासी समाजातील विविध प्रकारचे सांस्कृतिक गीतावर,मुलींनी आपली कला, आदिवासी संस्कृतीचे मुलांनी स्वः हस्तकलेतून निर्मित केलेल्या बाहुल्या,कानातील अलंकार, राखी यांचे प्रदर्शन उपस्थित मान्यवरांचे, प्रमुख पाहुण्यांचे आणि उपस्थित सर्व पालक माता पिता समस्त गुरुजन वर्गांचे मन जिंकून घेत, कार्यक्रमाचे वातावरण अतिशय प्रसन्न,प्रफुल्लित करून सर्वांची मने जिंकली.शासकीय माध्यमिक आश्रम शाळा थेटेगव्हाण ता. धारूर जि.बीड या ठिकाणी जागतिक आदिवासी दिन उत्साहामध्ये साजरा करण्यात आला.याप्रसंगी मंचावर उपस्थित प्रमुख पाहुणे सर्व पालक वर्ग विद्यार्थी आणि समस्त शिक्षक व शिक्षक इतर कर्मचारी या सगळ्यांची उपस्थिती होती.या कार्यक्रमाचे उत्कृष्ट असे अलौकिक बहारदार सूत्रसंचालन शाळेतील शिक्षक श्री गोरक्षनाथ आबुज व संभाजी मुसळे सरांनी केले तर आभार प्रदर्शन शिवाजी गांधले सरांनी केले. याप्रसंगी शिक्षक श्री.मारूती राठोड,श्री.परमेश्वर तावसे, श्री.नागनाथ चात्रे,श्री.जी.बी आबुज, श्री.शिवाजी गांधले,श्री. संभाजी मुसळे,श्रीमती.सारिका डोंगरे,श्रीमती.पूनम लांब,श्री.बी.ए लोंढे,श्री.बी व्ही बडे,श्री.हनुमान केंद्रे यांच्यासह इतर कर्मचारी यांची उपस्थिती होती. शेवटी सर्वच उपस्थित मान्यवरांनी भोजनाचा आस्वाद घेऊन शाळेच्या परिसराची पाहणी केली.

# तांदळा येथे जागतिक आदिवासी गौरव दिन साजरा



गेवराई/प्रतिनिधी

तालुक्यातील तांदळा येथे दि, ९ ऑगस्ट शनिवारी रोजी एकलव्य जयंती जागतिक आदिवासी गौरव दिन व एकलव्य चौकाचे उदघाटन केले, यावेळी तांदळा गांवकरी व एकलव्य संघटनेची मावळे उपस्थित होते,

तांदळा ग्रामपंचायत मध्ये जागतिक आदिवासी गौरव दिन एकलव्य जंयती साजरी करण्यात आली, यावेळी संरपंच नवनाथ गवते, बाळु माळी, पत्रकार संतोष भारती, गहिनीनाथ हाकाळे, जिजा सिरसट सह कोळगांव व तांदळा येथिल एकलव्य संघटनेची कार्यरते मोठ्या संख्येने उपस्थित होते, यावेळी संरपंच नवनाथ गवते, बाळु माळी, गहिनीनाथ हाकाळे यांनी एकलव्य यांच्या कार्याचा उजाळा दिला, एकलव्य यांनी दोर्णाचार्याचा पुतळा समोर उत्कृष्ट धनुर्धारी विद्याचे धडे घेत उत्कृष्ट धनुर्धारी म्हणून ज्ञान मिळाले, हेच कला समाजाला अवगत झाल्याने, त्यांना अचुक नेम साधता येतो, त्यामुळे सन १९९४ पासुन एकलव्य जंयती दिवशी जागतिक गौरव दिन म्हणून साजरा होत आहे, या दिवशी कार्यक्रमाचे निमीत्ताने येथे एकलव्य चौकाचे उदघाटन गांवचे प्रतिष्ठात नागरीक गहिनीनाथ बापु यांच्या हस्ते श्रीफळ फोडुन चौकाचे उदघाटन केले,

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, मोहन दत्तु गुंड यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर्स एम.एस.सी.बी ऑफीस जवळ माळीवेस ,बीड- ४३११२२ येथे छापून साप्ताहिक क्रांतीवीर कार्यालय, गुंड गल्ली केज ता.जिल्हा जि.बीड - ४३११२३ येथे प्रकाशीत केले आहे. मो ९४२३९७९४९२ Email- ID skrantiveer66gmail.com या अंकामध्ये प्रत्येक बातमी व लेखास संपादक सहमत असतीलच असे नाही,वाद विवाद केज न्यायालय अंतर्गत. उपसंपादक आप्पासाहेब महानोर मो ९५११७१२५९२

This News paper's owner, printr, editor, Mohan Dattu Gund printed this at the Mauli Offset Printers, Near Office MSCB at Malives, Beed-431122. and published at Weekly Krantiveer Office, Gund Galli, Kej Tq. Kaij Dist Beed Bead-431123. Mob 9423979492, Email ID- skrantiveer66@gmail.com Editor is not totally agree or disagree with the news and articles this issue. Disputes under jurisdiction of Kaij court. Deputy Editor Appasaheb Mahanor, Mo-9511712592